# प्रकरण तिसरे

## संबंधित साहित्याचा आढावा


३.० प्रस्तावना

३.१ दूरचित्रवाणीशी संबंधित भारतात व परदेशामध्ये झालेली संशोधने

३.२ अभ्यास सवयीशी संबंधित संशोधन

३.३ समारोप

# प्रकरण–तिसरे

## संबंधित साहित्याचा आढावा

### ३.० प्रस्तावना :

प्रस्तुत संशोधनासंबंधी संबंधित साहित्याचे सिंहावलोकन करणे महत्वाचे आहे. कारण त्याच्या अनुषंगाने संशोधकास तुलनात्मक दृष्टीकोन, योग्य ती संशोधनाची पध्दती आणि संशोधनाच्या तंत्राची कल्पना येते.

संबंधित संशोधन साहित्याचे सिंहावलोकन करण्याची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत.

१. निवडलेल्या संशोधन विषयासंबंधी पूर्ण झालेल्या संशोधनाची कल्पना येण्यासाठी आणि त्यांची पुनरावृत्ती टाळून योग्य विषय निवडण्यासाठी मार्गदर्शन प्राप्त करणे.

२. निवडलेल्या संशोधन विषयाच्याबाबतीत आवश्यक अशी पध्दती, तंत्र इत्यादीबाबतीत आवश्यक अशी पध्दती, तंत्र इत्यादी बाबतीत माहिती प्राप्त करून घेणे.

३. संशोधन विषयाच्यासंबंधी सिध्दांत आणि नियोजन कार्याची रचना समजून घेणे.

४. माहिती आणि निष्कर्ष यांच्याबाबतीत माहिती प्राप्त करणे, योग्य सांख्यिकी तंत्र आणि त्याचा उपयोग अथवा अर्थनिर्वचनासाठी मार्गदर्शन प्राप्त करणे.

५.संदर्भसाहित्याचे अवलोकन करून आपल्या ज्ञानसामग्रीत वाढ करणे.

प्रस्तुत संशोधन साहित्याच्या अवलोकनाकरीता दिलेल्या अभ्याससंचामध्ये १९८२ ते १९९२ मधील एकूण संशोधन अहवालांचा विचार करण्यात आलेला आहे. ते खालीलप्रमाणे आहेत.

### ३.१ दूरचित्रवाणीशी संबंधित भारतात व परदेशा मध्ये झालेली संशोधने खालील प्रमाणे.

**चक्रवर्ती टी. आर. आणि इतर (१९८२):**

यांनी 'उपग्रह आणि दूरचित्रवाणी' च्या माध्यमातून सूचनात्मक प्रयोग छत्तिसगढ

राज्याचा अभ्यास (NIRD) १९८२.

**संशोधनाची प्रमुख उद्दिष्टये पुढील प्रमाणे :**

१. ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांचा दूरचित्रवाणीच्याबाबतीत सामाजिक आणि आर्थिक संबंध पाहणे.

२. मागास भागात दूरचित्रवाणीचा विकास करण्यासाठी सामाजिक शर्तींचा अभ्यास करणे.

३. मिळणाऱ्या फायद्यापासून वंचित असणाऱ्या लोकांचा अभ्यास करणे.

४. उपग्रहाच्या सूचनेनुसार प्रयोगासाठी योग्य विचार व वागणूकीचा अभ्यास करणे.

५. एस. आय. टी. ई. ने लोकांना कशा प्रकारे आकर्षित केले आहे त्याचा अभ्यास करणे.

६. लोकांच्या आवश्यक गरजांच्या बाबतीत सूचनात्मक कार्यक्रमांचा संबंध आणि परिणाम याची समिक्षा करणे.

७. एस. आय. टी. ई. विषयी सामाजिक आंतरक्रिया, बदल आणि व्यवहार यांचा अभ्यास करणे.

८. गावपातळीवर दूरदर्शनचा संघटनात्मक दृष्टीकोन आहे याचा अभ्यास करणे.

**निष्कर्ष :**

१. एक चतुर्थांश पेक्षा कमी लोक दूरदर्शन पाहतात.

२. दूरचित्रवाणी प्रसारित होणाऱ्या कार्यक्रमांमध्ये स्थानिक संबंधाचा अभाव व हिंदी भाषेचा उपयोग यामुळे यश आलेले नाही.

३. सातत्याने असे लक्षात आले की दूरचित्रवाणी पाहणारे जे जाणकार आहेत तेच आळशी बनलेले आहेत.

४. स्थानिक संघटना व समित्यांचा अशा कार्यक्रमातून अभ्यास कमी होतो.

वरील सर्व संबंधीत संशोधन साहित्यामध्ये जास्तीत जास्त संशोधन हे शैक्षणिक दूरचित्रवाणी कार्यक्रमावर झालेले आहे, असे दिसून येते.

**सर्वसामान्य निष्कर्ष :**

१. मुलांना दूरचित्रवाणी जाहिराती, कार्यक्रम व खेळ पाहायला आवडतो.

२. चित्रपट व चित्रफितीव्दारे दिले जाणारे शिक्षण अधिक परिणामकारक आहे.

३. दूरचित्रवाणीवरील शैक्षणिक कार्यक्रमाचे प्रेक्षण हे उपयुक्त वेळेत होत नाही.

४. दूरचित्रवाणीवरील शैक्षणिक कार्यक्रम पाहणाऱ्या विद्यार्थ्यांचा भाषाविषयक फायदा झाला.

५. शैक्षणिक कार्यक्रम तयार करणाऱ्या व्यक्तींना भाषाविषयक ज्ञानाबरोबरच अध्यापनशास्त्राचेही ज्ञान असणे आवश्यक आहे.

**जोशी व्ही. (१९८७):** यांनी विज्ञान विषयातील माध्यमिक शालेय दूरचित्रवाणीचे कार्यक्रमाच्या परिणामकारकतेविषयी अभ्यास केला. त्यातून असे आढळून आले की, शालेय चित्रवाणी कार्यक्रमाच्या रचनेमध्ये बऱ्याच वर्षानंतरही कोणत्याही प्रकारचा बदल आलेला नाही. शोधामुळे असे दिसून आले की हे दूरचित्रवाणी कार्यक्रम अंत्यत कमी दर्जाचे असल्याने विद्यार्थ्यांच्या विज्ञानविषयक धोरणात कोणत्याही प्रकारचा बदल झालेला नाही. परिणामी विद्यार्थ्यांच्या प्रगती मध्ये ही बदल झालेला नाही.

**मोहंती पी. सी. (१९८८) :** यांनी प्राथमिक शाळेतील मुलांसंदर्भात शैक्षणिक चित्रवाणी कार्यक्रमाविषयी अभ्यास केला त्यामध्ये त्यांना असे आढळून आले की, ज्या मुलांना दूरचित्रवाणी कार्यक्रमाचा अनुभव घेतला आहे. त्याच्यामध्ये ज्या मुलांनी तो कार्यक्रम पाहिला नाही त्याच्याविषयक चांगला फरक आढळला तसेच ज्या मुलांनी कार्यक्रम पाहिला त्या विद्यार्थ्यांना भाषेविषयी अधिक फायदा झाला.

**शैक्षणिक तंत्रविज्ञान :- मलेशिया (१९८८)** : यांनी केलेल्या परीक्षणामध्ये दूरचित्रवाणी कार्यक्रमाची पाहणी केली. त्यांनी २८९ मुख्याध्यापक, ५३८ शिक्षक, ७७४पालक आणि १२४० विद्यार्थी यांची मुलाखत घेतली. सर्वेक्षणाअंतर्गत असा निष्कर्ष

काढला की, विद्यार्थ्यांना शैक्षणिक दूरदर्शन कार्यक्रम हवा आहे. (सुमारे प्रतिदिनी एक कार्यक्रम या हिशेबाने)

**बेहरा एस. सी. (१९९०)** : या अभ्यासानुसार शैक्षणिक दूरचित्रवाणीचा प्रभाव शिक्षकाच्या क्षमतेवर पडतो. या संशोधनाने असे दाखवून दिले की, जे शिक्षक शैक्षणिक दूरचित्रवाणी वरील कार्यक्रमाशी संबंधीत आहेत.त्याच्या ज्ञान, आकलन व उपाययोजन पातळी मध्ये खूपच फरक पडलेला आहे प्रत्यक्ष वर्गअध्यापनाची पाहणी केल्यास शैक्षणिक दूरचित्रवाणीवरील कार्यक्रम पाहणाऱ्या शिक्षकांत खूपच फ रक आढळून येतो. यामध्ये प्रतिसादाचे प्रमाण, प्रश्नांचे प्रमाण इ. हे शिक्षकाचा शक्तीनाश, यांत्रिक असंबंध्दता आणि अप्रमाणबध्द वेळ या गोष्टही निदर्शनास आणल्या आहेत.

**चौधरी एस.(१९९०)** : यांनी शिक्षकांच्या शालेय दूरचित्रवाणी पाहण्याचा दृष्टिकोन तसेच त्यांचा नोकरीतील समाधान कारकतेचा ही विचार केला. त्यांना असे आढळले की, नोकरीतील समाधान हे कार्याचे वितरण व तीव्र घटक यांच्यावर प्रामुख्याने अवलंबून असते. पाहणी अंतर्गत असे आढळून आले की बरेचसे शिक्षक शालेय दूरचित्रवानीचा वापर करीत नाहीत आणि त्यापैकी बरेचसे दूरदर्शन संच नादुरूस्ती झालेले आहेत. जे शिक्षक शालेय दूरदर्शनला शिक्षणातील एक बहूमोल साधन समजतात. त्याच्यापैकी काहीजण त्यांच्या व्यवसायातध्ये समाधानी असलेले दिसून आले.जे शिक्षक इयत्ता चौथी व पाचवीच्या वर्गाला शिकवतात त्याचा शालेय दूरचित्रवाणीकडे पाहण्याचा दृष्टिकोन इयत्ता पहिली ते चौथी या वर्गाला शिकवण्याऱ्या शिक्षकांपेक्षा सकारात्मक आहे.

**अनुराधा के. (१९९१)** : या अभ्यासात असे सांगितले आहे की, मुलांच्या दूरचित्रवाणी पाहण्याचा त्याचा वैयक्तिक व शैक्षणिक विकासावर परिणाम होतो. या अभ्यासाने असे सिध्द केले आहे की, मुलांना जाहिराती,कार्यक्रम आणि खेळ पाहायला आवडतात.

**ॲब्रॉल यु.(१९९१)** : यांनी दिल्लीमधील मुलांच्या दूरचित्रवाणी पाहणी विषयी

अभ्यास केला. हा अभ्यास ४४ वेगवेगळ्या प्राथमिक व माध्यामिक शाळेत शिकणाऱ्या ७५० विद्यार्थ्यावर आधारीत होता.

पाहणी अंतर्गत असे आढळून आले की बऱ्याच मुलांच्या माता या आपल्या मुलांच्या दूरचित्रवाणी पाहणीवर मर्यादा घालतात. पण त्यामुळे मुलां -मुलींवर कोणताही परिणामकारक फरक आढळून आलेला नाही.

**फुटेला आर. एल. एस. (१९९१)** : यांनी विनोद व विनोदी कार्यक्रमांचा मुलांवर होणारा परिणाम अभ्यासला, तेव्हा त्याच्या असे लक्षात आले की, तरूण मुलांना भितीदायक, प्राणीविषयक व मूर्ख माणसांविषयक कथा जास्त आवडल्या. मुले पुराणकथा व लोककथा यांच्या बाबतीतले जे विनोदी कार्यक्रम होते त्यांची हुबेहुब नक्कल करतात. बऱ्याच शिक्षकांचे असे मत होते की, विनोद हा विद्यार्थ्यांच्या भाषा व सौंदर्यशास्त्राच्या विकासाला मदत करतो. यातील महत्वाचा भाग असा की कोणत्याही शिक्षकाचे अथवा पालकाचे असे मत नव्हते की विनोद हा विद्यार्थ्यामधील गुन्हेगारी प्रवृतीला चालना देतो.

**मिश्रा एस.(१९९१)** :यांनी दूरचित्रवाणी चा घरातील वस्तू बनविण्याच्या भूमिके विषयीची पाहणी केली. त्यानी हा अभ्यास भुवनेश्वर मधील उच्च वर्गातील काम करणाऱ्या स्त्रीयांवर केला आणि त्यांच्या पाहणीत असे दिसून आले की दूरचित्रवाणी चे जे कार्यक्रम आहेत त्यांचा घरगुती वस्तू बनविण्याच्या कार्यात थोडासा सहभाग आहे.

**नारायणस्वामी एम. (१९९१) :** यांनी इयत्ता सहावीच्या मुलांना शिकवण्यासाठी तामिळ भाषेतील शब्दकोशाविषयी एक कार्यक्रम तयार केला. त्यांना असे दिसून आले की नियमित समुदायापेक्षा समक्ष समुदायाने ते शब्द लवकर आत्मसात केले.

**बिस्वाल बी.(१९९२)** : यांनी शैक्षणिक प्रसारणाबाबत एक अहवाल सादर केला.त्यांनी शैक्षणिक प्रशासनात प्रशिक्षणाची कशी आवश्यकता आहे. हे पटवून दिले.

**घोष एस.(१९९२)** : यांनी शैक्षणिक दूरचित्रवाणी तामिळनाडू मधील पाहणीचा

अभ्यास केला या कार्यक्रमाअंतर्गत शैक्षणिक कार्यक्रमाच्या पलीकडे जावून आरोग्य कार्यक्रम, शेती कार्यक्रम, प्रौढ साक्षरता कार्यक्रम यांचा अभ्यास केला. त्यांना असे दिसून आले की, जरी या कार्यक्रमाची वेळ उदार मनाने ठरवली असली तरी त्यांचे प्रक्षेपण हे उपयुक्त वेळी होत नाही व श्रोते हे कार्यक्रम पाहू शकत नाहीत.

**जैस्वाल के.(१९९२)** : यांनी दूरचित्रवाणी कार्यक्रमाची परिणामकारकता यांचा अभ्यास केला की जो विज्ञान शिक्षणाशी संबंधित होता.ही पाहणी बी. एड. डी. सी. या विद्यार्थ्यांवर करण्यात आली. या मध्ये असे दिसून आले की प्रात्यक्षिक साधनांच्या व्दारे घेतली गेलेली तासिका ही आधिक परिणामकारक होती. कमी अध्ययन नैपूण्य की जे विद्यार्थ्यांच्या ज्ञान व आकलनाशी संबंधित होते.यावर ७० कार्यक्रम आधारलेले होते सुमारे ३ /४ मुले ही कार्यक्रमाच्या परिणामकारकते बद्दल समाधानी होते. विशेष करून वापरलेली भाषा,तंत्रज्ञानात्मक दर्जा,एकत्रीकरण आणि आवाज व चित्र यांचे एकत्रिकरण इ. बाबत.

**कापडी ए.एम.(१९९२)** : यांनी दूरचित्रवाणीचा विद्यार्थ्यांच्या शिकवण्यावर पडणारा प्रभाव याविषयी संशोधन केले.जोशीच्या संशोधनाशी तुलना करता या गटाने (सुमारे ७० मुलांनी) अहवाल दिला की दूरदर्शन कार्यक्रम हे त्यांना अध्ययनात मदत करतात.

## ३.२ अभ्यास सवयीचे संबंधित संशोधने ख़ालील प्रमाणे :

**इंदिरा के –१९९२,**

नव साक्षरांच्या वाचन व अभ्यास पद्धती ची पाहणी केली असता असे दिसून आले की अनेक जण५३.३३% हे सकाळी वाचन करतात,३७.५%हे वाचन १तास ख़र्च करतात,अनेक जण ५०.८३ % हे आठवड्यातील पाच (५) दिवस वाचन करतात, फक्त ५ % लोक दररोज वाचन करतात, ६५ % लोक हे वाचनाकरीता ग्रंथालयावर अवलंबून

असतात.

## ३.३ समारोप

सदर प्रकरणात दूरचित्रवाणी व अभ्यास सवयीशी संबंधित भारतामध्ये आणि परदेशामध्ये झालेल्या संशोधन साहित्याचा आढावा घेतलेला आहे.

पुढील प्रकरणात प्रस्तुत संशोधनाच्या कार्य पध्दतीचा उहापोह केलेला आहे.